# संकेत स्थळावर प्रसिद्ध करावयाची जाहिरात

मुंबई पोलीस शिपाई भरती सन २०१९

जाहिरात क्रमांक ठिकाण दिनांक

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनानेवेळोवेळी आणि दिनांक १८.१.२०१९ व दिनांक ४.७.२०१९ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये मुंबई पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी (१०७६) पदे भरण्यासाठी मुंबई पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) मुंबई पोलीस शिपाई:

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज-अ | भ.ज-ब | भ.ज-क | भ.ज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | १६० | १४ | २६ | १६ | ४२ | ३५ | ११ | १५३ | १४० | १०७ | ३७२ | १०७६ |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ४८ | ४ | ८ | ५ | १३ | ९ | २ | ४४ | ४२ | ३४ | १०९ | ३१८ |
| महिला | ४८ | ४ | ८ | ५ | १३ | ११ | ३ | ४६ | ४२ | ३२ | १११ | ३२३ |
| खेळाडु | ८ | १ | १ | १ | २ | २ | १ | ८ | ७ | ५ | १८ | ५४ |
| प्रकल्पग्रस्त | ८ | १ | १ | १ | २ | २ | १ | ८ | ७ | ५ | १८ | ५४ |
| भुकंपग्रस्त | ३ | ० | १ | ० | १ | १ | ० | ३ | ३ | २ | ८ | २२ |
| माजीसैनिक | २४ | २ | ४ | २ | ६ | ५ | २ | २३ | २१ | १६ | ५६ | १६१ |
| अंशकालीन पदवीधर | ८ | १ | १ | १ | २ | २ | १ | ८ | ७ | ५ | १८ | ५४ |
| पोलीस पाल्य | ५ | ० | १ | ० | १ | १ | ० | ५ | ४ | ३ | १२ | ३२ |
| गृहरक्षक दल | ८ | १ | १ | १ | २ | २ | १ | ८ | ७ | ५ | १८ | ५४ |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| एकूण | १६० | १४ | २६ | १६ | ४२ | ३५ | ११ | १५३ | १४० | १०७ | ३७२ | १०७६ |

अ) उपरोक्त पदेही दिनांक ३१/१२/२०१९ अखेर पर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकाक्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिकाक्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

२) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/ तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.mahapolice.gov.inया संकेत स्थळावर (Home Page) वर व *(संबधित घटकाचे संकेतस्थळ येथे नमूद करावे)* वर उपलब्ध असुनते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्त्वाची टीपः-**

मुंबई पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणीकेल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, यांना दुरध्वनी क्रमांक ०२२२४९२१२१२ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त / अधीक्षक या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१९ तथा सह पोलीस आयुक्त, प्रशासन बृहन्मुंबई यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दूरध्वनी क्रमांकावरही तक्रारकरता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय, कक्ष ९ (पोलीस भरती कक्ष) न्यु. बी.डी.डी. चाळ नं. ६, पहिला माळा, दहिवलकर बुवा मार्ग, नायगांव, दादर पुर्व, मुंबई ४०००१४ | ०२२.२४१२३१११ |

( नवल बजाज )
सह पोलीस आयुक्त, प्रशासन,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकरिता